# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२, फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक : एमआयएस-०६१८/सीआर-०४/२०२१/तीन दिनांक : २८ जानेवारी, २०२१

-: **प्रसिद्धीपत्रक** :-

**विषय** :- दिव्यांग आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांच्या संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.

दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम, २०१६ च्या आधारे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग-२०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दिनांक २९ मे, २०१९ अन्वये शासन सेवेतील पदांवर शारीरिकदृष्ट्या दिव्यांग व्यक्तींकरीता आरक्षणाच्या अमंलबजावणीची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

**२.** शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : अप्रवि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ अनुसार दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्राबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. आयोगाच्या सर्वसाधारण सूचनांमधील तरतुदीनुसार एखाद्या जाहिरातीस अनुसरून आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना अर्जाद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवारांनी आयोगाच्या सूचनेनुसार कोणत्याही टप्प्यावर आवश्यक पुरावा/ कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. त्यानुसार अर्जाद्वारे दिव्यांग आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी सदर दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी निर्गमित केलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्र, संबंधित जाहिरातीकरीता अर्जाद्वारे दावा केलेल्या दिनांकापूर्वी प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे.

**३.** आयोगामार्फत सन २०२० मध्ये आयोजित करण्यात आलेल्या खालील जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करताना दिव्यांग आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांना त्यांच्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ सक्षम प्राधिकाऱ्याकडून निर्गमित करण्यात आलेल्या दिव्यांग प्रमाणपत्राची प्रत सादर करणे अनिवार्य आहे:-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | परीक्षेचे नाव | अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | १९/२०१९ | राज्य सेवा पूर्व परीक्षा - २०२० | १३ जानेवारी, २०२० |
| (२) | ०५/२०२० | महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा - २०२० | १९ मार्च, २०२० |
| (३) | ०६/२०२० | महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा – २०२० | ०७ एप्रिल, २०२० |

**४.** आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या उपरोक्त जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करताना दिव्यांग आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ आवश्यक प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

(१) उपरोक्त परीक्षांकरीता आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना दिव्यांग आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी ते सर्वसाधारण रहिवाशी असलेल्या जिल्ह्यातील सक्षम प्राधिकाऱ्यांकडून www.swavlambancard.gov.in या संगणकीय प्रणालीद्वारे वितरित केलेले विहित नमुन्यातील व किमान ४०% दिव्यांगत्व असल्याबाबतच्या व संबंधित परीक्षेकरीता अर्जाद्वारे दावा केलेल्या दिनांकापूर्वीच्या वैध दिव्यांग प्रमाणपत्राची स्कॅन प्रत पुरावा म्हणून सादर करावी.

(२) दिनांक ०२ ऑक्टोबर, २०१८ पूर्वी SADM प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र, प्रमाणपत्रावर उल्लेखित कालावधीपर्यंत अथवा कायमस्वरुपी जसा उल्लेख असेल तेवढ्या कालावधीपर्यंत ग्राह्य राहतील.

(३) वैध दिव्यांग प्रमाणपत्राचा दिनांक संबंधित जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर केलेल्या दिनांकापूर्वीचा असणे अनिवार्य आहे. दिव्यांग प्रमाणपत्र संबंधित जाहिरातीस अनुसरून अर्ज केलेल्या दिनांकापूर्वीचे नसल्यास उमेदवाराचा दिव्यांग आरक्षणाचा दावा रद्द करण्यात येईल व अशा पद्धतीने रद्द केलेला दावा नंतरच्या कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतला जाणार नाही.

(४) वैध दिव्यांग प्रमाणपत्र प्रत आयोगास पाठविताना त्यावर उमेदवाराने स्वत:चे नाव, परीक्षेचे नाव, अर्ज नोंदणी क्रमांक नमूद करून प्रथम स्वसाक्षांकित करावे व त्यानंतर प्रमाणपत्र स्कॅन करणे आवश्यक आहे.

(५) दिव्यांग आरक्षणासाठी अर्जाद्वारे दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या दाव्यापृष्ठ्यर्थ वरीलप्रमाणे वैध पुरावा सादर न केल्यास अथवा आयोगाकडे सादर केलेली कोणतीही कागदपत्रे अथवा प्रमाणपत्रे नंतर कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव खोटी, बनावट, खाडाखोड केलेली, अवैध, संबंधित शासन आदेश/नियमानुसार जारी न केलेली अथवा सक्षम अधिकाऱ्याने प्रदान न केलेली असल्याचे आढळून आल्यास अशी कृती आयोगाची फसवणूक करणारी समजण्यात येऊन आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षा व निवडींपासून उमेदवारास आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधित करण्यात येईल तसेच अशा उमेदवारांविरुद्ध संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई सुद्धा करण्यात येईल.

**५.** वरीलप्रमाणे संबंधित जाहिरातीस अनुसरून अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीची वैध दिव्यांग प्रमाणपत्राची स्कॅन प्रत pre-examination@mpsc.gov.in या इमेल आयडीवर **दिनांक २३ फेब्रुवारी, २०२१** पर्यंत सादर करणे अनिवार्य आहे. त्यानंतर प्राप्त विनंतीचा विचार करण्यात येणार नाही.

सहसचिव, परीक्षापूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई